# मिरा भाईंदर महानगरपालिका
## मा. स्थायी समिती सभा दि. १३/०४/२०१२

मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. स्थायी समिती सभा शुक्रवार दिनांक १३/०४/२०१२ रोजी सभा सुचना क्र. ०१ दि. ०९/०४/२०१२ रोजीच्या विषयपत्रिकेवरील विषयांवर विचार विनिमय करण्यासाठी मिरा भाईंदर महानगरपालिका, स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, दुसरा मजला, लाल बहाद्दुर शास्त्री सभागृहात दुपारी १२.०० वा. सभा आयोजित करण्यांत आली होती.

सदर सभेच्या अध्यक्षस्थानी मा. सभापती, श्रीम. कल्पना महेश म्हात्रे ह्या उपस्थित होत्या. सदर सभेस खालील सदस्य उपस्थित होते.

**उपस्थित सदस्य**

| | | |
|---|---|---|
| १. | श्रीम. कल्पना महेश म्हात्रे | सभापती |
| २. | श्री. स्टीवन जॉन मेंन्डोंसा | सदस्य |
| ३. | श्री. लक्ष्मण जंगम | सदस्य |
| ४. | श्री. भगवती तु. शर्मा | सदस्य |
| ५. | श्री. शशिकांत भोईर | सदस्य |
| ६. | श्री. मोहन गोपाळ म्हात्रे | सदस्य |
| ७. | श्री. मोहन जाधव | सदस्य |
| ८. | श्री. शफिक अहमद सादत खान | सदस्य |
| ९. | श्री. जुबेर इनामदार | सदस्य |
| १०. | श्री. अनिल दिवाकर सावंत | सदस्य |
| ११. | श्रीम. नयना म्हात्रे | सदस्या |
| १२. | श्रीम. मर्लिन डिसा | सदस्या |
| १३. | श्री. मधुसुदन पुरोहित | सदस्य |
| १४. | श्री. अग्रवाल ओमप्रकाश | सदस्य |
| १५. | श्रीम. नर्मदा वैती | सदस्या |
| १६. | श्री. बर्नड अल्बर्ट डिमेलो | सदस्य |

**गैरहजर सदस्य – निरंक**

**मा. सभापती :-**

सचिव साहेब, सभेच्या कामकाजाला सुरुवात करावी.

**उपसचिव :-**

या सुचनेद्वारे आपणांस कळविण्यांत येते की, मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. स्थायी समिती सभा शुक्रवार दि. १३/०४/२०१२ रोजी दुपारी १२.०० वाजता मिरा भाईंदर महानगरपालिका, स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, दुसरा मजला, लाल बहाद्दुर शास्त्री सभागृहात स्थायी समिती सभा सुचना क्र. ०१, दि. ०९/०४/२०१२ रोजीच्या विषयपत्रिकेवरील प्रकरणांवर विचार विनिमय करण्यासाठी आयोजित करण्यांत येत आहे. प्रकरण क्र. ०१, दि. ०९/०३/२०१२ रोजीच्या मा. स्थायी समिती सभेचे इतिवृत्तांत कायम करणे.

**भगवती शर्मा :-**

प्रकरण क्र. ०१, दि. ०९/०३/२०११ रोजीच्या मा. स्थायी समिती सभेच्या इतिवृत्तांतामध्ये मा. सदस्यांनी सुचविलेल्या दुरुस्ती व सुचनांसह इतिवृत्तांत कायम करण्यांत येत आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

माझे अनुमोदन आहे.

**जुबेर इनामदार :-**

मा. सभापती महोदय, आपण याच्या आधी झालेल्या सभेमध्ये आदेश दिले होते. अनुपालन अहवाल सादर करणे बाबत. जे ठराव झालेले आहे त्याच अनुपालन झालेल आहे की नाही? कुठे काही दिसत नाही. प्रशासनाने तस काही दिलेल दिसत नाही. त्या आदेशाला मान्य करत नाही.

**एस.ए.खान :-**

मा. सभापती मॅडम, मागे पण अनुपालन अहवालच बोलले होते. आपण ठराव करतो त्याच काय होत ती माहिती पाहिजे ना.

**दिपक सावंत :-**

मा. सभापती महोदयांच्या परवानगीने बोलतो, सध्या एम.एम.आर.डी.ए. रिजन मध्ये भिवंडी महानगरपालिकेच इलेक्शन असल्यामुळे जवळ-जवळ सर्वच आणि काही विभाग प्रमुख सोडले तर सर्वच विभाग प्रमुख यांना इलेक्शन ड्युटी आहे. D.C.M. यांना R.O. ची ड्युटी आहे. झोनलची ड्युटी आहे. प्रिसायडींग ऑफीसरची ड्युटी आहे. आणि त्यांना तिथे डी.सी.एम. पासून सर्वच स्टाफ आपला कारवाईसाठी वर्ग केला आहे. त्यामुळे अनुपालन अहवाल या सभेत सादर केला नाही. पुढच्या सभेमध्ये सर्व विभाग प्रमुखांकडुन एकत्र अहवाल करुन आस्थापना विभाग सादर करेल.

**जुबेर इनामदार :-**

तुमचा खुलासा समाधानकारक नाही. अनुपालन अहवाल सादर करायच काम सचिव कार्यालयाच आहे. त्यांनी ती माहिती गोळा करायची आहे. अधिकारी आहे नाही त्याचा काही संबंध नाही.

**एस.ए.खान :-**

अनुपालन अहवाल डिपार्टमेंट सचिव कार्यालयात देणार ना? सचिव तर आहेत. त्यांना कुठे ड्युटी लागली आहे आणि ज्यांना ड्युटी लागलेली आहे ते पण आस्थापनेकडे आहे. अस नाही की त्यांना ते काम सोडून करायच आहे.

**दिपक सावंत :-**

अधिका-यांकडून त्यांच्या कार्यालयामध्ये गेला नाही. आणि आम्ही तयार करुन सचिवांकडे सादर करु.

**मा. सभापती :-**

ठराव सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**प्रकरण क्र. १ :-**

दि. ०९/०३/२०१२ रोजीच्या मा. स्थायी समिती सभेचे इतिवृत्तांत कायम करणे.

**ठराव क्र. ०१ :-**

दि. ०९/०३/२०१२ रोजीच्या मा. स्थायी समिती सभेच्या इतिवृत्तांतांमध्ये मा. सदस्यांनी सुचविलेल्या दुरुस्ती व सुचनांसह इतिवृत्तांत कायम करण्यांत येत आहे.

**सुचक :- श्री. भगवती शर्मा.** **अनुमोदन :- श्री. ओमप्रकाश अग्रवाल**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**प्र. नगरसचिव :-**

प्रकरण क्र. २, भाईंदर (प.) प्रभाग समिती क्र.१ कार्यालया समोर असलेल्या इमारतीमध्ये गाळा क्र. १४ हिंदू वैकुंठधाम सामुग्री भांडार यांना भाड्याने देण्याची मुदत वाढविणेबाबत.

**भगवती शर्मा :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात भाईंदर (प.) येथे प्रभाग समिती क्र. १ चे कार्यालय असून सदर कार्यालयासमोर महानगरपालिकेची इमारत आहे. सदर इमारतीमध्ये १६ गाळे असून त्यापैकी गाळा क्र. १४ हिंदू वैकुण्ठ धाम साम्रगी भांडार यासंस्थेस भाडयाने देण्यात आलेला आहे. तत्पूर्वी ग्रामपंचायत काळापासून देखिल त्यांना गाळा भाडयाने देण्यात आला होता. सदर गाळा दि. ३०/६/२००३ पासून नाममात्र भाडयाने देण्यात येत असून वेळोवेळी मुदतवाढ देण्यात आलेली आहे. सदर मुदत ही दिञ २२/९/२०११ रोजी संपलेली असून सदर संस्थेने पुढील ११ वर्षाकरीता मुदतवाढ मागितलेली आहे.

सदर संस्था ही ग्रामपंचायत काळापासून ते आजपर्यत अंत्यविधीकरीता लागणारे सामान व पूजासाहीत्य इ. सामान गाळयात ठेऊन विक्री करते. त्याशिवाय अन्य कोणताही व्यवसाय करीत नसून कोणताही फायदा कमवत नाही. सदर संस्थेमार्फत करण्यात येणारे कार्य पहाता त्यांना पुढील पाच वर्ष मुदतीकरीता सदर गाळा भाडयाने देण्याकरीता मुदतवाढ देण्यास मान्यता देण्यात येत आहे.

**मोहन म्हात्रे :-**

माझे अनुमोदन आहे.

**शशिकांत भोईर :-**

याची मुदत कधी संपली दि. २२/९/२०११ ला आज आपल्याजवळ बरोबर सात महिन्यानंतर इथे मंजुरीसाठी आलेल आहे. मग, प्रशासन एवढी दिरंगाई का करते? हा विषय चांगला आहे. ह्याला आमची मान्यता आहे. परंतु, सहा महिन्यानंतर किंवा सात महिन्यानंतर आणण तर प्रशासनाच धोरण काय? त्याच स्पष्टीकरण केल तर बरं होईल ना. समजा आज आहे. तर दुसरे कुठले तरी असतील ना. वेळेत यायला पाहिजे. तुम्हाला माहित आहे. अमुख तारखेला संपते. तर एक महिना जास्तीत जास्त लेट होईल. पण, तुम्ही

सात-सात महिन्यानंतर विषय आणत असाल ते चूकीच आहे. योग्य नाही. प्रशासनाने याच्यावर खुलासा केला तर बरं होईल. आता तुम्ही प्रशासनाला बोलवलेल आहे. मग, त्यांना जरा बोलू दे.

**दिपक खांबित :-**

भाईंदर पश्चिम येथे आपल्या प्रभाग कार्यालय इमारती समोर आपण भाडेकरुचा एक इमारत बांधली आहे. आधी तिथे गाळे असायचे तर त्यांच्याकरिता आपण ९९ साली ती इमारत बांधलेली आहे. त्यामध्ये १६ गाळे आहेत. त्याच्यामधले १० गाळेवाले कोर्टामध्ये गेलेले आहे. २००१ साली आपल म्हणुन होत की, आपण त्याच भाड ठरवल होत. ५० स्क्वेअर फिट एरिया जो आहे त्याचा १००० रुपये महिना भाडे. आणि दिड लाख रु. डिपॉजिट. अस मा. महासभेने ते ठरवलं होत. सुरुवातीला २००२ मध्ये तर त्याच्या विरुध्द ते कोर्टात गेले. ते म्हणतात की, आम्ही जवळ-जवळ ७७ सालापासुन इकडे तत्कालीन ग्रामपंचायत पासून आमचे गाळे होते. तर आम्हाला तुम्ही ते फ्री दया किंवा आम्ही १००, २०० रु. जे महिना भरतो त्यानेच दया. आणि आपण म्हटल की, आता महानगरपालिका झाले आणि भाव वैगेरे वाढले जेव्हा तुम्ही तिथे होते तेव्हा रस्त्यावर तुमच्या टपरी होत्या ते तुम्ही स्वतः बांधले होते. आता महानगरपालिकेने तिकडे स्वतःच्या खर्चाने इमारत बांधली. त्यामुळे तुम्हाला १००० रु. भाड भरायला पाहिजे. तर ती केस अजून कोर्टामध्ये सुरु आहे.

**शशिकांत भोईर :-**

जर ह्याची केस सुरु असेल तर आपण मुदतवाढ देवू शकतो का?

**दिपक खांबित :-**

ते १० गाळे वेगळे आहेत. आमचा असा विचार होता की, त्यांचा निर्णय लवकर लागेल. आणि मग, आपण सगळे विषय एकत्र घेवू. निकाल लागला आहे. पण पुन्हा कोर्टामध्ये केस पेंडींग आहे.

**शशिकांत भोईर :-**

आता आपण जी मुदतवाढ देतो ती सात महिन्यानंतर देतो.

**दिपक खांबित :-**

आपण हायकोर्टात मधल्या काळात आपण अर्ज केलेला आहे. पण त्यांचा निकाल लागला नाही. म्हणून दिरंगाई झाली.

**शशिकांत भोईर :-**

आज स्थायी समितीची मान्यता दिली. मग आपल्या स्थायी  वर वेळ येईल ना, की कोणतेही न्याय प्रविष्ठ असताना न्यायालयाचा उल्लंघन........

**दिपक खांबित :-**

न्याय प्रविष्ठचे १० गाळे आहेत. त्याच्यामध्ये............

**शशिकांत भोईर :-**

हा गाळा नाही.

**दिपक खांबित :-**

नाही. यामुळे प्रशासनाला दिरंगाई झालेली आहे.

**मा. सभापती :-**

ठराव सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**लक्ष्मण जंगम :-**

मॅडम, आतापर्यंत या गाळयांना मुदतवाढ दिली. प्रत्येक वेळेला आपण किती-किती वर्षाची देत होतो. एक वर्षाची देत होतो का?

**दिपक खांबित :-**

तीन-तीन वर्षाची देत होतो. या वेळेला आयुक्तांनी पाच वर्षाची शिफारस केलेली आहे.

**प्रकरण क्र. २ :-**

भाईंदर (प.) प्रभाग समिती क्र.१ कार्यालया समोर असलेल्या इमारतीमध्ये गाळा क्र. १४ हिंदू वैकुंठधाम सामुग्री भांडार यांना भाड्याने देण्याची मुदत वाढविणेबाबत.

**ठराव क्र. २ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात भाईंदर (प.) येथे प्रभाग समिती क्र. १ चे कार्यालय असून सदर कार्यालयासमोर महानगरपालिकेची इमारत आहे. सदर इमारतीमध्ये १६ गाळे असून त्यापैकी गाळा क्र. १४ हिंदू वैकुण्ठ धाम साम्रगी भांडार यासंस्थेस भाडयाने देण्यात आलेला आहे. तत्पूर्वी ग्रामपंचायत  काळापासून देखिल त्यांना गाळा भाडयाने देण्यात आला होता. सदर गाळा  दि. ३०/६/२००३ पासून नाममात्र भाडयाने देण्यात येत असून वेळोवेळी मुदतवाढ देण्यात आलेली आहे. सदर मुदत ही दि. २२/९/२०११ रोजी संपलेली असून सदर संस्थेने पुढील ११ वर्षाकरीता मुदतवाढ मागितलेली आहे.

सदर संस्था ही ग्रामपंचायत काळापासून ते आजपर्यत अंत्यविधीकरीता लागणारे सामान व पूजासाहीत्य इ. सामान गाळयात ठेऊन विक्री करते. त्याशिवाय अन्य कोणताही व्यवसाय करीत नसून कोणताही फायदा कमवत नाही. सदर संस्थेमार्फत करण्यात येणारे कार्य पहाता त्यांना पुढील पाच वर्ष मुदतीकरीता सदर गाळा भाडयाने देण्याकरीता मुदतवाढ देण्यास मान्यता देण्यात येत आहे.

**सुचक :- श्री. भगवती शर्मा.   अनुमोदन :- श्री. मोहन म्हात्रे**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**प्र. नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ३, अग्निशमन दलातील अधिकारी / कर्मचाऱ्यांना गणवेश व इतर साहित्य खरेदी करणेबाबत.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागातील अधिकारी / कर्मचाऱ्यांना गणवेश व इतर साहित्य पुरवठा करणे कामी प्रसिध्द करण्यात आलेल्या पाचव्या जाहिर फेरनिविदा सुचनेनुसार सदर कामी मे. व्होरा इंटरप्रायजेस यांनी निविदा सादर केली आहे. सदर निविदेमध्ये निविदाधारकाने गणवेश व इतर साहित्य पुरवठा करणे कामी सादर केलेले दर प्रस्तावित गोषवाऱ्यात नमुद आहेत. सदरचा गोषवारा हा सन २०११-१२ ची तरतुद पाहून सादर केला होता.

परंतु, सन २०१२-१३ या आर्थिक वर्षात लेखाशिर्षक "ब" सार्वजनिक सुरक्षितता या लेखाशिर्षा अंतर्गत कर्मचारी गणवेश व बक्षीसे रु. ५०.०० लाख एवढी तरतुद करण्यात आली आहे. त्याप्रमाणे रु. ५०.०० लाख एवढी तरतुद टाकून सुधारीत गोषवारा पुढील स्थायी समिती सभेसमोर ठेवणेत यावा.

**भगवती शर्मा :-**

माझे अनुमोदन आहे.

**अनिल सावंत :-**

क्या हुआ है?

**भगवती शर्मा :-**

इसमें १९ लाख का बताया है ना। लेकिन इनको मंजुरी ५० लाख की चाहिए।

**अनिल सावंत :-**

अगर जरुरी १९ लाख की है तो १९ लाख को ही मंजुरी दे दो ना। जरुरी थोडी है की ५० लाख का प्रोव्हिजन है तो ५० लाख को ही मंजुरी देना चाहिए।

**जुबेर इनामदार :-**

अग्निशमन वालो ने बोला नही है की इनको ५० लाख की मंजुरी चाहिए।

**अनिल सावंत :-**

अभी १९ लाख का सॅन्शन करके दो। बाकी का बाद में दो।

**मा. सभापती :-**

ठराव सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**लक्ष्मण जंगम :-**

मा. सभापती मॅडम, ठराव मंजुर केला ठिक आहे. पण, उदया त्यांना कपडे नाही म्हणून त्यांनी कुठे आग लागली तिकडे गेले नाही. मग अडचण होवून जाईल. या ठरावामध्ये ज्यांनी सूचना दिली आणि जे अनुमोदन राहिले त्या दोघांची जबाबदारी राहिल. त्यांना सफाई दयायला लागेल. आणि त्याच्यामध्ये आमची सूचना आहे की अतिआवश्यक ज्या गोष्टी आहेत खरोखर त्याला मान्यता दयायला पाहिजे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

त्यांनी जे साहित्य मागितले ते अपुरी आहेत. ते साहित्य पूर्ण १९ लाखामध्ये येणार नाही. त्यांनी सध्या १९ लाखाची तरतुदी दया म्हणून आम्हाला दया. पण आता त्यांना साहित्य जास्त पाहिजे. १९ लाखामध्ये त्यांना पुरणार नाही. म्हणून आम्ही ते सांगितलेल आहे.

**शशिकांत भोईर :-**

संबंधित विभागाने तस स्पष्टीकरण करावे.

**जुबेर इनामदार :-**

क्लासो साहेब, याच्यामध्ये दिलेले साहित्य तुम्हाला पुढच्या स्थायी समितीच्या सभेपर्यंत मिळाले.........

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

त्यांच्या गोषवाऱ्यामध्ये क्लिअर लिहिलेल आहे. तक्त्यानुसार सदर गणवेश व इतर साहित्य खरेदी करणे करिता एकूण ७५ लाख ५४ हजार ४४६ रु. चे अपेक्षित आहे. त्यांनी ते ७५ लाख रु. सांगितलेल आहे. आणि सध्या १९ लाख होती. ७५ नाही १९ नाही. आम्ही ५० लाखाची तरतुद तुम्हाला देतो. आम्ही त्यांच्या गोषवाऱ्यात जे आहे ते सांगितल आहे. बाकी काही नाही सांगितल. त्यांना ७५ लाख रु. पाहिजे.

**शशिकांत भोईर :-**

त्यांनी खुलासा करावा ना.

**क्लासो फर्नांडीस :-**

मा. सभापती मॅडमच्या परवानगीने बोलतो, हा जो गोषवारा सादर केला आहे तो गेल्या वर्षाची तरतुद होती. २० लाख त्याच्या अनुषंगाने आम्ही प्रस्ताव सादर केला होता. फायर सुट वैगेर सगळ बघितल तर त्याला ७५ लाखाची आम्हाला गरज आहे. आणि आता १९ लाखामध्ये फक्त गणवेश आहे. तो फक्त सादर केला होता. म्हणजे फायर सुट वैगेरे होते ते. त्याच्यात येत नव्हते म्हणुन आम्ही याच्यात मागणी केली होती. गेल्यावर्षी २० लाख ची तरतुद असल्या कारणाने आम्ही तेवढाच खर्च मागवला होता. आणि यावर्षी आम्हाला ५० लाख रु. दिलेले आहे. त्याच्यामुळे आम्ही ५० लाखाची खरेदी करु शकू. त्याच्यात फायर सुट पण आम्हाला खरेदी करता येईल.

**शशिकांत भोईर :-**

मला असा खुलासा पाहिजे. तुम्ही सन २०११-१२ च्या बजेटचा मंजुर करुन घेता की, २०१२-१३ च मंजुर करुन घेता. त्याच स्पष्टीकरण करा.

**क्लासो फर्नांडीस :-**

गोषवारा दिला होता तेव्हा मार्चच्या अगोदर दिला होता. तेव्हा मी ती तरतुद टाकली होती.

**शशिकांत भोईर :-**

हा गोषवारा आहे तो २०११-१२ तला आहे.

**भगवती शर्मा :-**

ठराव केला ना. आम्ही त्यांची भावना तुमच्यासमोर मांडली होती.

**अनिल सावंत :-**

मा. सभापती मॅडम, ह्याला आर्थिक आणि प्रशासकीय मंजुरीचा विषयच नाही. निविदांना मंजुरी दयायची आहे. हा जो विषय आहे तो. निविदा तुम्हाला परत फेरनिविदा मागवाव्या लागतील. आणि त्या निविदा तुम्ही कॅन्सल केल्यानंतर परत फेरनिविदा मागवा. असा तो विषय आहे. त्याच्यामध्ये फायर फायटरचे रेट वैगेरे क्लिअर दिलेले आहे. त्याला मंजुरी दयायची आहे.

**प्रकरण क्र. ३ :-**

अग्निशमन दलातील अधिकारी / कर्मचाऱ्यांना गणवेश व इतर साहित्य खरेदी करणेबाबत.

**ठराव क्र. ३ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागातील अधिकारी / कर्मचाऱ्यांना गणवेश व इतर साहित्य पुरवठा करणे कामी प्रसिध्द करण्यात आलेल्या पाचव्या जाहिर फेरनिविदा सुचनेनुसार सदर कामी मे. व्होरा इंटरप्रायजेस यांनी निविदा सादर केली आहे. सदर निविदेमध्ये निविदाधारकाने गणवेश व इतर साहित्य पुरवठा करणे कामी सादर केलेले दर प्रस्तावित गोषवाऱ्यात नमुद आहेत. सदरचा गोषवारा हा सन २०११-१२ ची तरतुद पाहून सादर केला होता.

परंतु, सन २०१२-१३ या आर्थिक वर्षात लेखाशिर्षक "ब" सार्वजनिक सुरक्षितता या लेखाशिर्षा अंतर्गत कर्मचारी गणवेश व बक्षीसे रु. ५०.०० लाख एवढी तरतुद करण्यात आली आहे. त्याप्रमाणे रु. ५०.०० लाख एवढी तरतुद टाकून सुधारीत गोषवारा पुढील स्थायी समिती सभेसमोर ठेवणेत यावा.

**सुचक :- श्री. ओमप्रकाश अग्रवाल       अनुमोदन :- श्री. भगवती शर्मा.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**प्र. नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ४, मिरा भाईंदर महानगरपालिकेतील विविध विभागातील उपलब्ध असलेल्या प्रिंटरसाठी कन्झुमेबल स्टेशनरी पुरवठा करणे.

**मा. सभापती :-**

अवलोकन मंजुर करण्यात येत आहे.

**अनिल सावंत :-**

त्याच्यामध्ये आपण काट्रेज जे मागवतो. तर हे जे काट्रेजची जी प्राईज आहे ना. अलमोस्ट जे प्रिंटर आहे. त्याची आणि त्याची कॉस्ट अलमोस्ट सेम असते. जनरली कसे असते की, काट्रेज पाच-सहा वेळा तुम्ही रिफिलिंग करुन वापरु शकता. प्रत्येक वेळी नविन घ्यायची गरज नाही. त्याच्या इथे कुठे उल्लेख नाही आहे. कोणी प्रत्येक वेळी नविन वापरत नाही. आणि आपल्या पालिकेत कुठेच कलर प्रिंटर नाही आहे. फक्त ब्लॅक

ॲन्ड व्हाईट प्रिंटरर्स आहेत. मग, आपण ही मंजुर कशाला देतो कलर प्रिंटर्सची वैगेर? २६५०-२६५० ही टोनरची किंमत आहे. तर प्रिंटरची किंमत ३५०० रु. आहे.

**मनस्वी म्हात्रे :-**

सर, आपण फक्त ही रेटस्‌ची मंजुरी घेतो. आणि जशी रिक्वायरमेंट असेल तसेच वर्क ऑर्डर करतो.

**शशिकांत भोईर :-**

मॅडम, आपण रिफिलिंग करु शकता. तुम्ही रिफिलिंगसाठी कराना.

**मनस्वी म्हात्रे :-**

सर, रिफिलिंग केल्यानंतर टोनरची कॅपेसिटी कमी होते. प्लस प्रिंटरची वॉरन्टी पण एक्सपायर होते.

**जुबेर इनामदार :-**

आपल्याकडे जे प्रिंटर्स आहेत. ते एका वर्षापेक्षा जास्त झाल असेल. असे बरेच प्रिंटर्स तुमच्याकडे आहे. तुमच्या प्रिंटरची वॉरन्टी फक्त एकाच वर्षाची असते. तुम्ही त्या प्रिंटर्समध्ये रि-यूज केलेले रिफिल केलेले नीत काट्रेज वापरु शकता.

**मनस्वी म्हात्रे :-**

सर, रिफिल केल्याने नॉरमल जो टोनर असतो. तो जर हजार प्रिंट देणार असेल तर रिफिल केलेला ५०० प्रिंट देतो. हा डिफरन्स आहे.

**अनिल सावंत :-**

रिफिलची किंमत १०० रु. आहे. हा २६५० चा टोनर आहे. रिफिलिंगची किंमत १०० रु. आहे.

**मनस्वी म्हात्रे :-**

सर, आता आपण पुन्हा ही निविदा मागवलेली आहे. हे आतापर्यंतचा जो खर्च आहे त्याच्यासाठी आहे.

**अनिल सावंत :-**

म्हणजे कार्योत्तरी मंजुरी आहे.

**मनस्वी म्हात्रे :-**

अवलोकन आहे.

**अनिल सावंत :-**

त्याच असं म्हणन आहे की, जो ऑलरेडी खर्च झालेला आहे. त्याची ते मंजुरी घेतात.

**जुबेर इनामदार :-**

आपण काट्रेज किंवा टोनर हे रि-यूज करतच नाही का?

**मनस्वी म्हात्रे :-**

नाही.

**अनिल सावंत :-**

करायला पाहिजे ना. आणि याच्यामध्ये तुम्ही कलर प्रिंटर्सचे टोनर पण दिलेले आहे.

**मनस्वी म्हात्रे :-**

सर, आपण मागवलेले नाही.

**अनिल सावंत :-**

फक्त मंजुरी घेतो.

**मनस्वी म्हात्रे :-**

हो फक्त मंजुरी घेतो.

**अनिल सावंत :-**

आम्हाला कस कळणार की, आमची मंजुरी घेतल्यानंतर तुम्ही मागवता की नाही? जर गरजच नाही तर मंजुरी कशाला घ्यायची?

**लक्ष्मण जंगम :-**

एवढया ह्याच्यामध्ये तफावत आहे तर तुम्ही कस काय ह्याला मंजुरी देवू शकता? आपण जी मंजुरी देतो ती एवढया मोठया प्रमाणात तफावत असेल तर कस काय देवू शकता? ज्या वस्तुची किंमत २६५० आहे आणि इकडे रिफिल करायला १०० रु. सांगता. म्हणजे २५०० हजाराचा फरक.

**मनस्वी म्हात्रे :-**

सर, रिफिलिंगमुळे टोनरची पार्टस्‌ची वॉरन्टी संपते.

**भगवती शर्मा :-**

तुमची काही सूचना असेल तर ती सांगा.

**शशिकांत भोईर :-**

प्रत्येक वेळेला आपण टोनर विकत घ्यायचा २५०० रु. आपल्याला लॉस जाईल. तो पण आपल्याला रिफिलींग करुन देतो. आपण कुठे बघतो की सिल पॅक आहे की नाही. तो आणला टोनर लावला. आणि आपण टेंडर देतो. त्याची एक वर्षाची गॅरेन्टी असतेच. एक टोनर घेतल्यानंतर १५ दिवसात संपत असेल किंवा १ महिन्यात किंवा २ महिन्यात संपत असेल नंतर १० महिने आपल्याजवळ राहतात ना.

**जुबेर इनामदार :-**

इन जे टोनर आहेत. इन जे काट्रेज आहेत त्याचे लॉट कमी असेल ना. लेजर चे जे मोठे काट्रेज असतात त्याची कॅपेसिटी भरपूर असते. त्याला काहीच होत नाही.

**अनिल सावंत :-**

रिफिलिंगच असते. पावडर लावून रिफिलिंग करतात.

**शशिकांत भोईर :-**

प्रत्येकाचा वेगळा कम्प्युटर असेल तर तो यूज करत असेल ना. मग नविनच का घ्यावे?

**अनिल सावंत :-**

मा. सभापती मॅडम, रिफिलिंगसाठी तुम्ही कॉल करा त्याची सुध्दा गॅरेंटी देणार आहेत.

**मनस्वी म्हात्रे :-**

डायरेक्ट H.P. वाले नाही आहेत. हे A.B. काट्रेजवाले आहे. जे आपल्याला रिफिल करुनच देतात. आणि ॲक्चुअल H.P. चे रेटस् आहेत. त्याच्यापेक्षा हे ५० टक्के रेटस् कमी आहे.

**अनिल सावंत :-**

हे रिफिलिंगचे रेट आहेत की, नविनचे रेट आहे.

**मनस्वी म्हात्रे :-**

A.B. चे नविन रेट आहे.

**भगवती शर्मा :-**

आम्ही नविनची मान्यता देत नाही. एच.पी. ची रिफिलिंगसाठी १०० रु. ची रिफिलिंग असते. त्याला आमची मान्यता आहे.

**जुबेर इनामदार :-**

आपले जुने जे काट्रेज निघतात ते तुम्ही काय करता?

**मनस्वी म्हात्रे :-**

सर, कंपनीवाले ते घेवून जातात.

**जुबेर इनामदार :-**

कंपनीवाले परत घेवून जातात. आणि ते A.B. वाले आपल्याला दुसरे देतात ह्या दराने.

**मनस्वी म्हात्रे :-**

हो.

**जुबेर इनामदार :-**

मॅडम ३५० रु. ऑटोमॅटीकली तेच झाल.

**अनिल सावंत :-**

ते तुम्हाला रिफिलिंग करुनच देतात. नविन देत नाही.

**जुबेर इनामदार :-**

तेच झाल ना. आपण जूनेच वापरतो. याच्यामध्ये वॉरन्टी कुठून आली?

**मनस्वी म्हात्रे :-**

वॉरन्टी प्रिंटर्सची असते. सर, ह्याच्यामध्ये A.B. काट्रेजवाले प्रिंटरची सर्विसिंग इनक्लुड करुन देतात. म्हणजे कोणताही प्रिंटर बंद पडल्यानंतर आपण प्रिंटरला A.M.C. मध्ये इनक्लुड केलेल नाही.

**जुबेर इनामदार :-**

हे जे दर तुम्हाला आलेले आहे ते भरपुर जास्त आहेत.

**मनस्वी म्हात्रे :-**

सर, ह्याच्यामध्ये अजून ते लोक आपल्या रिक्वायरमेंटप्रमाणे सप्लाय पण करतात प्रिंटर ते पण फ्री मध्ये.

**जुबेर इनामदार :-**

हा विषय परत आणू दया. आयुक्तांबरोबर चर्चा करुन आणून दया. कारण, अशाप्रकारे करता येणार नाही. पालिकेला टोनर्सची काट्रेजची गरज आहे.

**मनस्वी म्हात्रे :-**

सर, ही निविदा ऑलरेडी एक्सपायर झालेली आहे. आतापर्यंत झालेला खर्च आहे.

**शशिकांत भोईर :-**

मॅडम, याच्यामध्ये माझी सूचना आहे. अवलोकनामध्ये जरी तुम्ही मंजूर करत असाल ह्याच्यापुढे कोणताही टोनर कंपनीला देतात. तर रिफिलिंग आपण कमीत कमी ६ ते ७ वेळा करु शकतो. जर प्रिंटरची गॅरेन्टी १ वर्षापर्यंत असेल तर आपण १ वर्षापर्यंत प्रिंटर वापरत असतो तर त्या कंपनीची गॅरन्टी आहे. मग आपण टोनर रिफिलिंगला टाकला तर ती कंपनी रिपेरींग करुन देईल. जर हे टोनरवाले बोलतात की आम्ही रिफिलींग करतो. तर आम्ही टोनर बसवल्यानंतर त्या प्रिंटरची सर्विसिंग आम्ही का करुन देवू. मग ती कंपनी काही करणार नाही नविनच घेवूना. तर याच्यापूढे घेताना रिफिलिंगसाठी टेंडर मागवावे. अन्यथा याच्यापुढे येणारे अवलोकन मंजुर करणार नाही.

(मा. सभापतींच्या आदेशाने सदर विषय फेटाळण्यात आला.)

**प्र. नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ५, निविदांस मान्यता देणे. (सार्व. बांधकाम विभाग)

**अनिल सावंत :-**

मा. सभापती मॅडम, ही जी पाच नंबरची निविदा आहे. त्याला आर्थिक आणि प्रशासकीय मंजुरी कधी मिळाली? आणि नियमाप्रमाणे तुमच्या वॅलिड तीन निविदा आल्या पाहिजे. याच्यामध्ये दोनच निविदा आहे.

**दिपक खांबित :-**

मा. महासभा दि. २०/०४/२०११ ठराव क्र. १५ ह्या ठरावामध्ये तीन कामे पास झाली होती. ह्याच्यामध्ये एक पास झाल होत. भाईंदर पूर्व रेल्वे समांतर जो कल्वर्ट पर्यंत झाल ते गोल्डन नेस्टच्या इथे क्रॉसिंग चालू आहे. रेल्वे ब्रिजच्या बाजूला आणि हे अशी तीन कामे पास झाली होती. तर ह्याच आपण टेंडर काढल होत. १ कोटीच टेंडर काढल होत. तेव्हा कमिश्नर साहेब नविन आले. त्यावेळेला त्यांनी हे काम पेंडींग ठेवल होत. की लेव्हल वैगेरे चेक करु. त्यांनी संपूर्ण या कामाचा अभ्यास केला, दहा वेळा तिथे जावून चेक केल. सगळं लेव्हल वैगेरे करायला लावले. रेल्वेच्या लोकांशी चर्चा केली आणि आता त्यापैकी ५० लाखाचा एक पार्ट मंजुरीसाठी ठेवलेला आहे.

**अनिल सावंत :-**

त्याच्यामध्ये गोल्डन नेस्टच काम सॅन्शन झाल.

**दिपक खांबित :-**

झाले.

**अनिल सावंत :-**

ह्याच्यामध्ये त्यावेळी मंजुरी घेतली होती. मग ह्याला वॅलिड तीन निविदा पाहिजे ना.

**दिपक खांबित :-**

साहेब, निविदा तीन पाहिजे असा काही नियम नाही. पण Genially आपण Competition करताना बघतो की, अंदाजपत्रक किंवा त्याच्या खाली जर रेट असतील तर आपण मंजुर करतो. जर above असेल तर आपण देत नाही.

**भगवती शर्मा :-**

| अ.क्र | कामाचे नाव / ठेकेदाराचे नाव | अंदाजित खर्च / ठेकेदाराने सादर केलेले दर |
|---|---|---|
| १ | भाईंदर (प) सुदामानगर फूट ओव्हर ब्रीज ते फाटककडे जाणारा समांतर नाला पुर्नबांधणी करणे<br>**१) मे. गजानन कंन्स्ट्रक्शन**<br>२) मे.ललित इंटप्रायजेस<br>३) मे. एम.एस इंटप्रायजेस | रु. ५०,००,०००/-<br><br>**अंदाजपत्रकिय दराने**<br>५.०० जास्त दराने<br>कागदपत्राची पुर्तता झालेली नसल्याने निविदा उघडली नाही. |

वरीलपैकी मे.गजानन कंन्स्ट्रक्शन यांच्या अंदाजपत्रक दराच्या निविदेस मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (क) अन्वये मान्यता देण्यात येत आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

माझे अनुमोदन आहे.

**जुबेर इनामदार :-**

मा. सभापती महोदय, याच्यामध्ये दुसरा विषय असा होता ५ टक्के दर जास्त असून सुध्दा हे विषय आपल्या स्थायी समिती समोर आलेले आहे. तर मुंशी कंपाऊंड मध्ये.............

**दिपक खांबित :-**

अंदाजपत्रक आहे.

**मा. सभापती :-**

आवलोकन मान्य करण्यात येत आहे.

**जुबेर इनामदार :-**

मला याच्यावर ठराव करायचा आहे. मुंशी कंपाऊंड मधला एक विषय आला होता. एक नाला काढायचा होता. पाण्याच्या टाकी जवळचा. त्याच काम झाल? निविदा प्रक्रिया तर पूर्ण झालेली आहे. त्याच १४ टक्के बिल वाढ. दिलेल्या प्रक्रिया पूर्ण झाली हा विषय आपल्या समोर कधी आलेला नाही. तर हा विषय पूढच्या सभेमध्ये घेणार का?

**मा. सभापती :-**

पुढच्या मिटींगमध्ये विषय घेते.

**प्रकरण क्र. ५ :-**

निविदांस मान्यता देणे. (सार्व. बांधकाम विभाग)

**ठराव क्र. ०४ :-**

| अ.क्र | कामाचे नाव / ठेकेदाराचे नाव | अंदाजित खर्च / ठेकेदाराने सादर केलेले दर |
|---|---|---|
| **१** | भाईंदर (प) सुदामानगर फूट ओव्हर ब्रीज ते फाटककडे जाणारा समांतर नाला पुर्नबांधणी करणे<br>**४) मे. गजानन कंन्स्ट्रक्शन**<br>५) मे.ललित इंटप्रायजेस<br>६) मे. एम.एस इंटप्रायजेस | रु. ५०,००,०००/-<br><br>**अंदाजपत्रकिय दराने**<br>५.०० जास्त दराने<br>कागदपत्राची पुर्तता झालेली नसल्याने निविदा उघडली नाही. |

वरीलपैकी मे.गजानन कंन्स्ट्रक्शन यांच्या अंदाजपत्रक दराच्या निविदेस मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (क) अन्वये मान्यता देण्यात येत आहे.

**सुचक :- श्री. भगवती शर्मा.** **अनुमोदन :- श्री. ओमप्रकाश अग्रवाल**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**ठराव वाचून कायम करण्यात आला**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**मा. सभापती :-**

आजची सभा संपली असे मी जाहिर करते.

**सभा संपल्याची वेळ - दुपारी १२.४० वाजता.**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**प्र. नगरसचिव**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**